लोकमत

## माणिकराव साळुंखे : शिवाजी विद्यापीठ व 'रवळनाथ हौसिंग'च्यावतीने वेबिनार

# अंमलबजावणीवरच नव्या शैक्षणिक धोरणाचे भवितव्य

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अत्यंत महत्त्वाकांक्षी स्वरुपाचे असले तरी, प्रत्यक्षात आपण त्याची अंमलबजावणी



कशी करणार, यावर त्याचे भवितव्य अवलंबून आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या भारती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे यांनी रविवारी केले.

> “नव्या शैक्षणिक धोरणाचे महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याशी अनेक बाबतीत साम्य आहे. त्यामुळे या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये राज्यात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही.
>
> \- आनंद मापुस्कर

> “सध्याची शिक्षणव्यवस्था खूप स्तरित स्वरुपाची आहे. हे स्वरुप बदलण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. देशात आजघडीला ९९३ विद्यापीठे, ५० हजार महाविद्यालये आहेत. १०,७०० स्वायत्त संस्था आहेत.
>
> \- डॉ. तपती मुखोपाध्याय, 'एमफुक्टो'

> “जुन्या शिक्षणक्रमातील उत्तम ते सोबत घेऊन जाण्याबरोबरच आधुनिक काळात आवश्यक असणाऱ्या शिक्षण, संशोधन, कौशल्यांशी कशा पद्धतीने जुळवून घेते, त्यावरुन नव्या धोरणाचे मूल्यमापन करायला हवे.
>
> \- डॉ. नितीन करमळकर, प्रभारी कुलगुरु

शिवाजी विद्यापीठाची अकॅडमी फॉर अकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेशन आणि रवळनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटी यांच्यातर्फे आयोजित 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०' या विषयावरील राष्ट्रीय वेबिनारमध्ये प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, तर अधिसभा सदस्य एम. एल. चौगुले प्रमुख उपस्थित होते.

ज्ञानवर्धनाबरोबरच मूल्यव्यवस्था, सांस्कृतिक मूल्ये यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी या धोरणाने पेलली पाहिजे. शिक्षणासाठी करण्यात आलेली तरतूद गेल्या काही वर्षांत कमी-कमी होत गेल्याचे दिसते. कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांचा आदर्श घेऊन आपण शिक्षणासाठीची तरतूद वाढविण्यासंदर्भात गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, असे मत डॉ. साळुंखे यांनी व्यक्त केले. नव्या शैक्षणिक धोरणाने उच्च शिक्षणातील प्रवेशाचा टक्का ५० टक्क्यांपर्यंत (जीईआर) नेण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. त्याची पूर्तता कशा प्रकारे करावयाची, याचा विचार साकल्याने केला जाणे अपेक्षित आहे. देशातील विद्यापीठे ही आजही मुख्यत: शिकविणारीच (टीचिंग) आहेत. तेथील संशोधनाचे प्रमाण तुलनेत कमीच आहे. त्यामुळे यापुढील काळात नव्या धोरणानुसार देशातील विद्यापीठांनी आता केवळ ज्ञान देणारे न राहता ज्ञाननिर्मितीची केंद्रे होणे अभिप्रेत आहे, असे नवी दिल्ली येथील 'निपा' संस्थेच्या शैक्षणिक धोरण विभागाचे प्रमुख प्रा. अविनाश सिंग यांनी सांगितले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठाच्या अकॅडमी फॉर अकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेशन डॉ. एस. टी. कोंबडे यांनी सूत्रसंचालन केले.


# नवे शैक्षणिक धोरण शिक्षणात सुसूत्रता आणणारे

## डॉ. माणिकराव साळुंखे : शिवाजी विद्यापीठातर्फे नव्या शैक्षणिक धोरणाबाबत राष्ट्रीय वेबिनार

प्रतिनिधी
कोल्हापूर

केंद्र सरकारने जाहीर केलेले नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देशातील सर्व प्रकारच्या शिक्षणामध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न करणारे आहे. नवे धोरण खरोखरीच अत्यंत महत्वाकांक्षी स्वरुपाचे असले तरी प्रत्यक्षात आपण त्याची अंमलबजावणी कशी करणार, यावर तिचे भवितव्य अवलंबून आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाची ॲकॅडमी फॉर ॲकॅडमिक ॲडमिनिस्ट्रेशन व श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स (मल्टीस्टेट), गडहिंग्लज, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०' या विषयावरील राष्ट्रीय वेबिनारमध्ये प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर अध्यक्षस्थानी होते.



एकविसाव्या शतकातील हे पहिले शैक्षणिक धोरण दूरगामी महत्वाचे असल्याचे सांगून कुलगुरू डॉ. साळुंखे म्हणाले, शिक्षणाचे बहुस्तरीय विस्तारीकरण, ज्ञानवर्धन, संशोधन अशा सर्वच स्तरांवर नवे शैक्षणिक धोरण फार मूलगामी स्वरुपाचे आहे. देशातील सर्व प्रकारच्या शिक्षणामध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न यामध्ये करण्यात आला आहे. शैक्षणिक धोरण विभागाचे प्रमुख प्रा. अविनाश सिंग म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाने उच्चशिक्षणातील प्रवेशाचा टक्का ५० टक्केपर्यंत (जीईआर) नेण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. त्याची पूर्तता कशा प्रकारे करावयाची, याचा विचार साकल्याने केला जाणे अपेक्षित आहे. देशातील विद्यापीठे ही आजही मुख्यत: शिकविणारीच आहेत. डॉ. आनंद मापुस्कर म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाचे महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याशी अनेक बाबतीत साम्य आहे. त्यामुळे या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये राज्यात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. आपल्याकडे संलग्नित महाविद्यालयांचे प्रमाण अधिक आहे. नव्या कायद्यानुसार स्वायत्तता देण्याच्या कामी सुलभीकरण केल्यामुळे आता शिक्षण संस्था स्वायत्तता घेऊ लागल्या आहेत. क्लस्टर महाविद्यालये स्थापन होऊ लागले आहेत.

'एम-फुक्टो'च्या डॉ. तपती मुखोपाध्याय म्हणाल्या, सध्याची शिक्षणव्यवस्था खूप स्तरित स्वरुपाची आहे. हे स्वरूप बदलण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. एम.एल. चौगुले यांनी स्वागत, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले, तर विद्यापीठाच्या ॲकॅडमी फॉर ॲकॅडमिक ॲडमिनिस्ट्रेशनचे समन्वयक डॉ. एस.टी. कोंबडे यांनी आभार मानले.

शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, सुमारे ३६ वर्षांनंतर आलेले नवे शैक्षणिक धोरण जुन्या शिक्षणक्रमातील उत्तम ते सोबत घेऊन जाण्याबरोबरच आधुनिक काळात आवश्यक असणाऱ्या शिक्षण, संशोधन, कौशल्यांशी कशा पद्धतीने जुळवून घेते, त्यावरून त्याचे मूल्यमापन करायला हवे. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम निवडीच्या संदर्भात जे स्वातंत्र्य या धोरणाने दिले आहे, ते उत्साहदायी आहे. जगातल्या कोणत्याही नामांकित संस्थेमध्ये कोणताही अधिकृत अभ्यासक्रम पूर्ण करून क्रेडिट बँक तयार करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली आहे.

तरुण भारत Mon, 24 August 2020
https://epaper.tarunbharat.com/c/54433823